



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

जग कधीच तुमच्या स्वाभिमानाची पर्वा करत नाही.
स्वतःबद्दल अभिमान बाळगण्याआधी,
काहीतरी करुन दाखवा.
स्वतःला सिध्द करा...
– बिल गेट्स

वर्ष : ०५ | अंक : ८१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०४ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी !

## मंत्री आदिती तटकरे यांनी दिली महत्वाची माहिती !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुंबई :** महायुती सरकारसाठी संजीवनी ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आता E-KYC आणि इतर तांत्रिक बाबींमध्ये अडकली आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींचा हफ्ता कधी येणार याकडे महाराष्ट्रातील महिलांचं लक्ष लागून होतं. पण, आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑक्टोबर महिन्याचा हफ्ता ४ नोव्हेंबरपासून म्हणजेच उद्यापासून खात्यात जमा होणार आहे, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी 'एक्स'वर दिली आहे.

**आदिती तटकरे 'एक्स'वर काय म्हणाल्या?**

आदिती तटकरे यांनी 'एक्स'वर याबाबत माहिती दिली आहे. त्यात त्यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : महिला सक्षमीकरणाची अखंड क्रांती!' असं म्हटलं आहे. पुढे त्यांनी म्हटलं आहे की, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना ऑक्टोबर महिन्याचा सन्म ान निधी वितरित करण्याच्या प्रक्रियेस उद्या पासून सुरुवात होत आहे. लवकरच योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात सन्मान निधी वितरित होणार आहे. महाराष्ट्रातील माता-भगिनींच्या अखंड विश्वासाने सुरू असलेली सक्षमीकरणाची ही क्रांती यशस्वीरित्या म ार्गक्रमण करत आहे. ही वाटचाल अशीच अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी मागील महिन्यापासून https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर E-KYC सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व लाडक्या बहिणींनी १८ नोव्हेंबरचा आधी E-KYC प्रक्रिया पूर्ण करावी ही नम्र विनंती !

**E-KYC कधी पर्यंत करायचं?**

दरम्यान, लाडकी बहिण योजनेसाठी E-KYC करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. पण मधल्या काळात E-KYC करत असताना अनेक अडचणींना सामना करावा लागत होता. E-KYC करताना OTP येत नसल्याचं उघड झालं होतं. अनेक महिलांनी याबद्दल तक्रार केली होती. त्यानंतर आदिती तटकरे यांनी याची दखल घेतली. तांत्रिक अडचणी दूर होऊन E-KYC प्रक्रिया अधिक सुलभ आणि सुकर करण्यात आली आहे. आता १९ नोव्हेंबरपर्यंत E-KYC करणे बंधनकारक असणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची सुरुवात जुलै २०२४ पासून करण्यात आली आहे. तेव्हापासून लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना




दरमहा १५०० रुपये दिले जातात.

## नवनीत राणा रुग्णालयात दाखल; २५ दिवस बेडरेस्टचा सल्ला !



**अक्षराज : प्रतिनिधी**


**दि.०३, नागपूर :** भाजप नेत्या आणि अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांना पायाला झालेल्या गाठीमुळे नागपूरमधील नरेंद्रनगर येथील सुयोग हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या जुन्या इजेचा त्रास पुन्हा उद्भवल्याने त्यांना उपचारासाठी तातडीने दाखल करण्यात आलं. सुप्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. गिरीश मोटवानी यांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून सध्या त्या उपचार घेत आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढील २५ दिवस त्यांना पूर्ण बेडरेस्ट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नवनीत राणा यांच्या पायाला झालेली दुखापत ही लोकसभा निवडणुकीच्या प्रचार काळात झालेल्या फ्रॅक्चरशी संबंधित असल्याचं वैद्यकीय सूत्रांनी सांगितलं आहे. निवडणुकीच्या काळात सतत प्रवास, सभा आणि जनसंपर्क मोहिमेमुळे त्या इजेला पूर्ण विश्रांती मिळाली नव्हती. त्यामुळे आता त्याच ठिकाणी सूज आणि गाठ तयार झाली आहे. अमरावती येथील नामांकित ऑर्थोपेडिक तज्ञ डॉ. शाम राठी यांच्या सल्ल्यानुसार नवनीत राणा यांना नागपूरमधील रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रुग्णालयातील सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार त्यांना काही काळ शारीरिक हालचाल टाळावी लागेल आणि आवश्यक ते उपचार पूर्ण केल्यानंतरच त्या पुन्हा राजकीय कार्यात सहभागी होऊ शकतील. त्यांचे पती आमदार रवी राणा हे सतत रुग्णालयात त्यांच्या सोबत उपस्थित आहेत.

**"रुग्णालयाबाहेर तगडा पोलीस बंदोबस्त !"**

दरम्यान, नवनीत राणा यांना काही दिवसांपूर्वी धमक्या मिळाल्याचा मुद्दा चर्चेत आला होता. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी पोलिसांकडे सोपवण्यात आली आहे. रुग्णालय परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला असून केवळ त्यांच्या जवळच्या व्यक्तींनाच भेटण्याची परवानगी दिली जात आहे. पोलिसांकडून सर्वोतोपरी काळजी घेतली जात आहे. कारण नवनीत राणा यांना नुकत्याच काही दिवसांत दोनवेळा धमकी देण्यात आली आहे. सध्या त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून डॉक्टरांनी योग्य उपचार आणि पूर्ण विश्रांती घेतल्यास त्या लवकरच पुन्हा तंदुरुस्त होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## द्राक्षे शेतीतून उध्वस्त शेतकऱ्याची आत्महत्या !



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** द्राक्षे शेतीतून आर्थिक नुकसान झाल्याने उगाव (ता. निफाड) येथील शेतकरी कैलास यादव पानगव्हाणे यांनी आज सकाळी विष प्राशन करून आत्महत्या केली. द्राक्षे पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यात या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी सुमारे ८.३० वाजता कैलास पानगव्हाणे हे नेहमीप्रमाणे आपल्या द्राक्षबागेत फेरफटका मारण्यासाठी गेले होते. कोरोना काळापासून द्राक्ष बाजारपेठ कोसळली असून या वर्षीचा हंगाम चांगला जाईल अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र बागेची खराब व उध्वस्त अवस्था पाहून त्यांनी नैराश्यातून द्राक्षबागेतच विषारी औषधाचे सेवन केले. ही बाब लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने निफाड ग्रामीण रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. कैलास पानगव्हाणे यांच्यावर बँक, सोसायटी व सावकारी अशा तिन्ही कर्जांचे ओझे होते. हंगाम चांगला गेल्यास कर्जमुक्त होऊ अशी त्यांची अपेक्षा होती. गेल्या काही दिवसांपासून ते मानसिक तणावात असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. राज्य सरकारने सप्टेंबरमध्ये द्राक्षे माल नसताना पंचनामे करून तुटपुंजी मदत दिली. प्रत्यक्ष हंगामात मोठे नुकसान दिसून येत असून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळत नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. शेतकरी संघटनांनी द्राक्ष उत्पादकांसाठी तातडीने फेर पंचनामे, आर्थिक मदत व कर्जमाफीची मागणी पुन्हा एकदा जोराने केली आहे.

## रणजितसिंह नाईक निंबाळकर अक्षरश: ढसाढसा रडले; म्हणाले...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, सातारा :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्याकडून वारंवार फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले. यानंतर आता रणजितसिंह निंबाळकर यांनी आज जाहीरपणे पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. यावेळी त्यांनी आपण नार्को टेस्ट करायला तयार आहे, असं रणजितसिंह म्हणाले. तसेच आपल्या बरोबर आरोप करणाऱ्या सर्वांची नार्को टेस्ट व्हावी. मी खर्च करायला तयार आहे, असं निंबाळकर म्हणाले आहेत. पत्रकार परिषद संपल्यानंतर रणजितसिंह यावेळी प्रचंड भावूक झाले आणि अक्षरश: ढसाढसा रडताना दिसले.





रणजितसिंह निंबाळकर यांनी स्क्रिन लावून आपल्या आरोपांवर खुलासा केला. यामध्ये रणजितसिंह यांच्यावर पेट्रोल चोरी केल्याचा गुन्हा दाखल झाल्याचं कथित पत्र दाखवलं. मला सुषमा ताई, मेहबूब शेख, विरोधी नेते मंडळींना सांगायचं आहे, मी रणजितसिंह नाईक निंबाळकर नार्को टेस्ट करायला तयार आहे. त्याचबरोबर माझ्यावर आरोप करणाऱ्यांनीदेखील नार्को टेस्ट करायला तयार असल्याचं आज सर्व सोशल मीडियावर जाहीर करावं, असं चॅलेंज निंबाळकर यांनी दिलं.

सुषमा अंधारे यांचा यात दोष नाही. त्यांना मास्टरमाइंडने माहिती दिली. ताईने माहिती तशीच घेतली. पत्रकारांनी माझी बाजूच उचलली नाही. पत्रकारांनी जसं मला गुन्हेगार ठरवलं तसंच ताईंनी आरोप केले, असं रणजितसिंह नाईक निंबाळकर म्हणाले. यावेळी त्यांनी ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी रामराजे यांचा मास्टरमाईंड असा उल्लेख केला. रामराजे यांच्याकडूनच आपली बदनामी होत असल्याचा दावा रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केला.

**"सुषमा अंधारे यांना रामराजेंचा मेसेज?**

सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा २०१७ चा कथित व्हिडीओ दाखवला. या व्हिडीओत अनेक तलवारी आणि शस्त्र असल्याचं सुषमा अंधारे यांनी सांगितलं. संबंधित व्हिडीओ संपल्यानंतर मोबाईलवर ठठ छळालरश्रज्ञरअ‍ॅ यांनी मेसेज केल्याचं नोटीफिकेशन दिसतं. ते माध्यम ांच्या अचूकपणे कैद झालं आणि तेच रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी पत्रकार परिषदेत अचूकपणे दाखवलं. दरम्यान, पत्रकार परिषदेनंतर रणजितसिंह निंबाळकर यांच्या सम र्थकांनी त्यांचा दुग्धाभिषेक केला. यावेळी रणजितसिंह भावूक सुद्धा झाले. ते ढसाढसा पडले. हे पाहून त्यांचे समर्थकदेखील भावूक झाले.

## शिळ ग्रामस्थांचा लढा प्रांत न्यायालयात, पुढील सुनावली १ डिसेंबरला...

### प्रांत अधिकारी ग्रामस्थांना न्याय देतील अशी ग्रामस्थांना आशा...







**अक्षराज : विनोद वास्कर**


**दि.०३, मौजे शिळगांव (ठाणे) :** आज दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता संपूर्ण शिळगावातील ग्रामस्थांनी कायदेशीर लढा देण्यासाठी उपविभागीय अधिकारी ठाणे मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.ॲडव्होकेट चेतन्य केणी व अभिवक्ते हे कायदेशीर बाजू ग्रामस्थांची मांडत आहेत.

मौजे शिळ ता.जि ठाणे सर्वे नंबर/ हिसा नंबर, ५७/१, ५७/२अ, ५७/३अ, ५७/४ या मिळकतीबाबत फेरफार क्रमांक ४०८२,३९१२ दिनांक ०८/०९/२०२५ व विवादग्रस्त पकरणी नोंदणी क्रमांक २१/२०२५ विरुद्ध वास्तु इम्पेरिया एलएलपीजी तर्फे भागीदार विजय शर्मा, सुरेंद्र पाण्डेय, अजय शर्मा , नागेंद्र पाण्डेय यांनी दाखल केले आहे. त्यानुसार सदर अपील गुणवत्तेवर निर्णित करणेकामी प्रथम सुनावणी दिनांक ०३/११/ २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी ठाणे या ठिकाणी ठेवण्यात आली होती.

मौजे शिळगांवातील संपूर्ण ग्रामस्थ मोठ्या संख्येने जिल्हा अधिकारी कार्यालय ठाणे या ठिकाणी कायदेशीर लढा देण्यासाठी एकवटले होते. कायदेशीर लढ्यामध्ये ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, तरुण-तरुणी उपविभागीय अधिकारी ठाणे या ठिकाणी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंड अधिकारी ठाणे : श्रीमती उर्मिला पाटील यांनी ग्रामस्थांना पुढील महिन्याची १ डिसेंबर २०२५ सुनावणीची तारीख दिली आहे. उर्मिला पाटील यांनी ग्रामस्थांची बाजू ऐकून घेतली आहे.

मोठ्या संख्येने ग्रामस्थ कायदेशीर लढा देण्यासाठी आले आहेत. हे स्वतःहून त्यांच्या डोळ्यांनी पाहिले. पुढील निकाल ग्रामस्थांचेच बाजूने लागेल असे ग्रामस्थांना वाटत आहे. प्रांत (उपविभागीय) अधिकारी ग्रामस्थांना न्याय देतील अशी आशा ग्रामस्थांना आहे.

## संपादकीय



### कर्जमाफी होईल, पण...

बच्चू कडू, राजू शेट्टी आणि अजित नवले हे शेतकरी नेते आणि शेतकरी संघटनांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनामुळे येत्या ३० जूनपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांना करावी लागली. मुळात लाडकी बहीण योजना आणि शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनांच्या जोरावरच महायुतीला राज्यात सत्तेचा सोपान गाठता आला. योगायोगाने याच महिन्यात सरकारची वर्षपूर्ती होणार असल्याने बारा महिन्यांच्या कारभाराचे प्रगतिपुस्तक सत्ताधाऱ्यांना मांडावे लागेलच. निवडणूक काळातील शेतकरी वीजबिल माफीसह आणखी बरीच आश्वासने प्रलंबित असली; तरी वरील दोन्ही प्रमुख घोषणांची पूर्तता केल्याचा दावा करून महायुती सरकार स्वत:ची पाठ नक्कीच थोपटून घेईल. ‘सबका साथ, सबका विकास’ या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीचाच हा भाग असल्याचे पुन्हा पुन्हा सांगितले जाईल. महिला व दीनदुबळ्या वर्गासह शेतकऱ्यांसाठी आपले सरकारच मसीहा असल्याचे दाखवून देण्याचेही प्रयत्न होतील.

अलीकडे राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांच्या अंगात श्रेयवादाचा गुण पुरता भिनल्याने त्याबद्दल हरकत असण्याचेही कारण नाही. परंतु, ‘लाडक्या’ बहिणींना ओवाळणी देतादेता आर्थिक बेजार झालेल्या सरकारला या नव्या योजनेसाठी साधारण पंचवीस ते तीस हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार, एवढे नक्की! अलीकडे कर्जमाफी योजनांशी केंद्राचा संबंध उरला नसल्याने आधीच रित्या झालेल्या तिजोरीत या रकमेची जुळवाजुळव करण्याचे आव्हान राज्याला स्वबळावरच पेलावे लागेल. गत वर्षभराचा अनुभव लक्षात घेता विकासकामे वा अन्य घटकांच्या पैशांत काटछाट करून ही आर्थिक जुळवणी केली जाईल. परंतु, नव्या कर्जमाफीने शेतकरी अल्पकाळ सुखावणार असले तरी बँकांवर मात्र विपरीत परिणाम होण्याचा धोका उद्भवतो. खासकरून आर्थिक संकटात सापडलेल्या, उर्जितावस्थेसाठी धडपडणाऱ्या सहकारी बँकांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते, हे सांगण्यासाठी आर्थिक जाणकार वा तज्ज्ञाची अजिबात आवश्यकता नाही.

आजमितीस राज्यातील अशा आठ-दहा जिल्हा बँकांच्या अडचणी अधिक वाढणार आहेत. एकट्या नाशिक जिल्ह्याचा विचार केल्यास मागील सात-आठ वर्षांपासून दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे आता काय होणार, हा प्रश्न पुन्हा उपस्थित होतो आहे. वसुली मोहीमच थंडावणार असल्याने ‘दुष्काळात तेरावा महिना’ अशी तिची अवस्था होणार आहे. मरणासन्न अवस्थेतील या संस्थेच्या बहुचर्चित सामोपचार योजनेला (ओटीएस-वन टाइम सेटलमेंट) आज बरोबर तीन महिने पूर्ण होत आहेत. सुमारे ३५ हजार सभासद योजनेसाठी पात्र ठरले खरे; परंतु अवघ्या तीन हजार सभासदांनी ‘हो-नाही’ करीत ३६ कोटी रुपयांच्या थकबाकीचा भरणा केला. ही रक्कम थकबाकीच्या डोंगराच्या तुलनेत अत्यल्प व असमाधानकारक असली तरी बँकेला मात्र ‘बुडत्याला काडीचा आधार’ याप्रमाणे सहाय्यभूत ठरणार होती. काही महिन्यांपूर्वी नागपूर जिल्हा बँकेचे पुनरुज्जीवन करून बँकिंग क्षेत्रात आदर्श निर्माण करणारे अर्थतज्ज्ञ विद्याधर अनास्कर प्रशासक प्रमुख म्हणून लाभले. त्यांचे आटोकाट प्रयत्न व जोडीला ‘ओटीएस’च्या माध्यमातून जोमाने वसुली होऊन नाशिक जिल्हा बँक पुन्हा सक्षम होऊ शकेल, असा आशावाद व्यक्त होत होता. मुद्दल व व्याज मिळून सुमारे तेवीसशे कोटी रुपयांची सभासदांची थकबाकी असल्याने शासनाकडे ६७२ कोटींच्या भागभांडवलाची मागणीही प्रशासक मंडळ व सभासदांनीही मधल्या काळात केली.शिखर बँकेच्या माध्यमातून ही आर्थिक मदत मिळेल तेव्हा मिळेल तोवर ‘ओटीएस’च्या माध्यमातून मार्चपर्यंत किमान दीडएकशे कोटींची वसुली होण्याची अपेक्षा होती. परंतु, आता कर्जमाफीची घोषणा झाल्याने प्रशासकांच्या प्रयत्नांवर पाणी फेरून ती फोल ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

कर्ज माफ होण्याच्या अपेक्षेने छोट्या-मोठ्या थकीत कर्जदारांकडून या वित्तीय संस्थेला ठेंगा दाखवला जाऊ शकतो. त्यात चालू वर्षात बँकेने ३७१ कोटींचे कर्जवाटप केलेले आहे. ही मंडळीसुद्धा कर्ज भरण्याची शक्यता नाही. त्यामुळे पुढील वर्षात हे कर्ज वितरणही अशक्यप्राय होईल.

# महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी !




२ नोव्हेंबर २०२५ हा दिवस भारतीय महिला क्रिकेट इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदवला जाणार आहे कारण यादिवशी भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवत विश्व विजयाला गवसणी घालत ऐतिहासिक कामगिरी केली. या क्षणाची प्रतीक्षा १४५ कोटी भारतीय गेली अनेक दशके करत होता. रविवारी नवीमुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने विजय मिळवून देशवासीयांना दिवाळीची अनोखी भेट देतील याची चाहूल शुक्रवारी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यातच लागली होती. ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेमिना रॉड्रिग्स हिने अविश्वसनीय खेळ करून भारताला अंतिम फेरीत पोहचवले. अंतिम फेरीत भारताचा मुकाबला दक्षिण आफ्रिकेशी होता. भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारतीय संघ विश्वषकावर नाव कोरेल असा विश्वास देशवासीयांना होताच मात्र दक्षिण आफ्रिकेला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नव्हता कारण साखळीत या संघाने भारताला नमवले होते. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी दिली. शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी शतकी सलामी देऊन भारताला चांगली सुरुवात करून दिली. भारताची सलामीवीर शेफाली वर्माने धडाकेबाज फलंदाजी करत अवघ्या ७८ चेंडूत ८७ धावा केल्या विशेष म्हणजे ती भारताच्या मुख्य संघात नव्हती मात्र प्रतिका रावल ही दुखापतग्रस्त झाल्याने तिची भारतीय संघात निवड झाली आणि तिने मिळालेल्या संधीचे सोने केले. धडाकेबाज फलंदाजीसोबतच तिने दोन बळी घेऊन अष्टपैलू कामगिरी केली आणि सामनावीर किताब मिळवला. दीप्ती शर्मा या आणखी एका अष्टपैलू खेळाडूने अर्धशतक झळकावले आणि गोलंदाजीत ५ बळी मिळवले. स्पर्धेत २०० च्या वर धावा आणि सर्वाधिक २२ बळी या तिच्या अष्टपैलू कामगिरीची दखल घेऊन तिला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. शेफाली आणि दीप्तीला स्मृती मानधना, हरमनप्रित कौर, जेमिना रॉड्रिग्ज, रिचा घोष यांची चांगली साथ दिल्याने भारताने २९८ धावा काढल्या. अंतिम सामन्यात या धावा पुरेशा ठरल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केल्याने भारताने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी सहज नमवता आले. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा हिने झुंझार शतक झळकावत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला पण तिचे प्रयत्न अपुरे ठरले आणि भारताने ऐतिहासिक विजय मिळवत पहिल्यांदाच विश्वचषकावर नाव कोरले. भारतीय महिलांची ही कामगिरी महिला क्रिकेट संघासाठी संजीवनी देणारी ठरणार आहे कारण आपल्या देशात महिला क्रिकेटला कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. हा विश्वचषक असल्याने याचे थेट प्रेक्षपण केले गेले मात्र द्विपक्षीय मालिका टीव्हीवर दाखवल्या जात नाहीत. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात हेच या विश्व विजयाने दाखवून दिले आहे. याआधी भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी दोनदा विश्वचषक जिंकला आहे मात्र वरिष्ट संघाला विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश येत होते. दोनदा भारतीय संघ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचला होता मात्र त्या संघांना विश्व विजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते त्यामुळे भारताच्या वरिष्ट संघाला विजेतेपद मिळवणे शक्य नाही अशी टीका होत होती. साखळी फेरीतही भारतीय महिला संघाने सलग तीन सामने गमावल्या नंतर या संघावर टीका होऊ लागली मात्र भारताच्या महिला खेळाडूंनी या टीकेकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वानाच चकित केले. भारतीय महिला संघाने फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर अप्रतिम कामगिरी केली. कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी या संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघाला विश्व विजयी करण्यात मोलाची कामगिरी बजावली. एकूणच सांघिक कामगिरी करून भारताने हा विश्वविजय मिळवला आहे. भारताच्या महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या महिला खेळाडूंच्या कामगिरीचा देशातील १४५ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच हरमनप्रित कौरच्या या संघाने करून दाखवले आहे. पहिल्यांदाच विश्वचषक जिंकून भारताच्या या महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या महिला खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या महिला संघाने यापूर्वी देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात गांभीर्याने घेतले जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विश्व विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. पहिल्यांदाच विश्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!! जय हो!!!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## नारी वर्ड कप..




वर्ड कप विजयाने
चकित झाले डोळे
महिला क्रिकेट वरी
सुखद नजरा खिळे

कायखेळतीमहिला
ठोकले वाटेत खिळे
अभिनंदन वर्षांवात
समस्त रसिक खुळे

टाळ्यांच्या गजरात
अवघेमैदानही खेळे
आधी खचे पराजये
नारी प्रवेशास टाळे

आता नव दालनांचे
निखळूनि पडे टाळे
प्रोत्साहितसंघास्तव
फुलावे कौतुक मळे

पुरवा सोयी सुविधा
उपटून भेदांची मुळे
पुरूष संघा इतकेचं
उत्कृष्टमानधन मिळे

सुंदर केश संभारात
दिव्यमानांकने माळे
प्रकाशमान उजळले
ते ग्रहण सुटले काळे

नारी सरस इथेसुध्दा
क्षणैकजगतास कळे
नारीशक्तीअलौकिक
करआपसूक ग जुळे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... बातमी


# जा रे जारे रे पावसा - तुला देतो पैसा

जवळ जवळ एप्रिल महिन्यापासून सुरू झालेला पाऊस आता नोव्हेंबर सुरू झाला तरी जाता जाईना अजुनही काही दिवस पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. गुजरात, महाराष्ट्र, गोवा या राज्यात काही भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

साधारणतः जुन ते सप्टेंबर ऑंक्टोबर या कालावधीत पावसाळा असतो. शेतकऱ्यांबरोबरच आपण सगळेच पावसाची चातकासारखी वाट बघत असतो. पावसाळा सुरू झाला की सारेच सुखावतात. यावेळी मात्र आता जा रे पावसा अशी म्हणण्याची पाळी आली आहे. विकासाच्या मृगजळामागे धावतांना निसर्गाची केलेली अपरिमित हानी आणि यामुळे पर्यावरणाचा बिघडलेला समतोल यामुळे ऊन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ऋतुंचे कालचक्रच बिघडले आहे. ग्लोबल वार्मिंगचा परिणाम मोठ्याप्रमाणावर होऊ लागला आहे. पृथ्वीचे तापमान वाढत चालले आहे आणि ग्लेसिअर वितळु लागले आहे याचा परिणाम पावसावर देखील होत आहे अनेकदा अवेळी पडणारा अवकाळी पाऊस, वादळे, अतिवृष्टी ही केवळ आणि केवळ नुकसानच करत आहे.एवढा पाऊस पडुन देखील या वर्षी पाणी टंचाई निर्माण होणार नाही याची शाश्वती नाही, दरवर्षी जानेवारी ते जुन पाणी टंचाई निर्माण होते आणि टॅंकर लॉबीचे भले होते. पाणी जमीनीत मुरत नाही त्यामुळे भुगर्भातील पाण्याची पातळी दरवर्षी खाली खाली जात आहे. पाणी नियोजन, जल संधारण यासाठी करोडो रुपये खर्च केले जातात मात्र ते पावसाच्या पाण्यात वाहून जातात आणि कोणाच्या तरी खिशात झिरपुन जातात. शेतकऱ्यांना आर्थिक मदत, कर्जमाफी यावरून आंदोलन, मोर्चे, चर्चा, जुन २०२६ चा वायदा, आरोप प्रत्यारोप याचा कलगीतुरा रंगला. दिवाळीला शेतकऱ्यांच्या हातात मदत मिळेल असे आश्वासन आश्वासनच ठरले काहींच्या हाती खात्यात नाममात्र पैसा पडला.

यंदा देखील पावसाने आली लहर केला कहर अशी परिस्थिती झाली आहे. पीक पाणी चांगले झाले असतांना राज्यातील सर्वच भागात विशेषतः मराठवाडा, विदर्भ, ऊत्तर महाराष्ट्र या भागात अतिवृष्टीने हाता तोंडाशी आलेले पीक मातीमोल झाले आहे. सोयाबीन, कापूस इतर धान्ये पाण्यात कुजुन वाया गेली आहेत.कोकणात देखील वेगळी परिस्थिती नाही.ठिकठिकाणी पाणी साचले असुन चौघांचा मृत्यू झाला आहे, पीकाचे तर फारच नुकसान झाले आहे, पशुधन देखील बळीराजाला गमवावे लागले आहे. समाजमध्यमे, वर्तमानपत्रे यातुन बळीराजाच्या व्यथा समाजासमोर येत आहेत त्या मन हेलावून टाकणाऱ्या आहेत. पाऊस नाही पडला तरी नुकसान पाऊस पडला तरी नुकसान, भरीस भर म्हणून शेतकऱ्यांच्या कुठल्याही मालाला योग्य भाव मिळत नाही ही कायमची व्यथा.





**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

कधी कोकणात अतिवृष्टी तर कधी, ऊत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे केवळ आणि केवळ नुकसानच होत आहे.यंदा पाऊस काही जाता जाईना. परिणामी जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजा समोर जगावे कि मरावे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे याची परिणती मोठ्याप्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमधे होत आहे. जर अन्नधान्यच नष्ट होणार असेल तर भविष्यात त्याचा विपरित परिणाम अन्नाचा तुटवडा, महागाई यावर होऊन त्याची झळ सर्वांनाच बसणार आहे. अगोदरच महागाईचा आगडोंब त्यात भर पडत आहे ती पावसामुळे नुकसानीचे.यंदा तर गणपती, नवरात्र, दसरा दिवाळीत ऐन लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पावसाने हजेरी लावली. अजुनही पाऊस जाण्याची काही शक्यता दिसत नाही. हा पाऊस जणु संकट म्हणूनच आला आहे आणि ग्रामीण भाग असो कि शहरी भाग असो सगळीकडेच पावसाचा कहर सुरू आहे. नदी नाल्यांना पुर येऊन दूथडी भरून पहात आहे आणि शेतात नागरी वस्तीत पाणी शिरुन केवळ आणि केवळ नुकसानच होत आहे.अनेक ठिकाणी धरणे भरून वाहत आहेत. मराठवाडा, विदर्भ, सोलापूर, धाराशीव, बीड, जालना या भागात तसा पाऊस कमी पडतो मात्र गेल्या काही वर्षांपासून बदललेले हवामान, निसर्गाची झालेली अपरिमित हानी यामुळे या भागात देखील पावसाचे वेळापत्रकच बिघडले आहे.

पीकाचे तर फारच नुकसान झाले आहे, पशुधन देखील बळीराजाला गमवावे लागले आहे. शेतकरी दरवर्षी पावसाची चातकासारखी वाट पहात असतात यंदा मात्र पावसाला आली लहर केला कहर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि कधीकाळी ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा असे म्हटले जात होते आता मात्र जा रे जा रे पावसा तुला देतो पैसा असे म्हणण्याची पाळी आली आहे. पैसा झाला खोटा आणि पाऊस आला मोठा.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## ई-पीक पाहणीला पुन्हा मुदतवाढ; ३० नाव्हेंबरपर्यंत शेतकर्यांना नोंदणीसाठी मुदत




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** नगरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सप्टेंबर महिन्यांत आलेली पूरसदृश परिस्थिती, अवकाळी पाऊस आणि दुबार पेरणी यामुळे खरीप हंगाम २०२५ च्या ई-पीक पाहणी नोंदणीत अडथळे आले. यामुळे राज्य सरकारच्या महसूल विभागाने शेतकर्यांना ई- पाहणीसह पुन्हा मुदतवाढ दिली आहे. यामुळे ३० नोव्हेंबरपर्यंत शेतकर्यांना ई-पीक पाहणी करता येणार आहे. महसूल विभागाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून राज्यात खरीप हंगाम २०२५ साठी शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी करण्याची मुदत ३० सप्टेंबर रोजी संपली होती. त्यानंतर १ ऑक्टोबरपासून सहायक स्तरावरून नोंदणी सुरू करण्यात आली होती, ती मुदत २९ ऑक्टोबर होती. मात्र, नैसर्गिक संकटामुळे मोठ्या प्रमाणावर पीक नोंदणी होऊ शकली नाही. आकडेवारीनुसार, आतापर्यंत डिजिटल क्रॉप सर्व्हेअंतर्गत राज्यातील एकूण क्षेत्रापैकी केवळ ३६.१३ टक्के पिकांचीच नोंद पूर्ण झाली आहे.

पीक नोंदणी न झाल्यामुळे शेतकरी नैसर्गिक आपत्ती, पीक विमा आणि पीक कर्ज यासारख्या महत्त्वाच्या लाभांपासून वंचित राहू नयेत, यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्हा कृषी विभागाच्यावतीने शेतकर्यांनी ई-पिक पाहणीला मुदतवाढ आलेली असल्याने शेतकर्यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत खरीप हंगाम २०२५ ची ई-पिक पाहणी करून घ्यावी. यासाठी शेतकर्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नगर जिल्ह्यात अद्याप खरीप हंगामातील पिकांची ई-पीक पाहणी झालेली नाही. पीक विमा योजनेसाठी ई-पीक पाहणी सक्तीची असून अतिवृष्टीच्या अनुदानाचा लाभासाठी ई-पीक पाहणी फायद्याची असून शेतकर्यांना पीक कर्जासाठी देखील ई-पीक पाहीणीचा फायदा होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांनी ई -पीक पहाणी करून घ्यावी,असे आवाहन कृषी व महसूल विभागाने केलेले आहे.

## किनवट - माहूर दौरा; आ. चिखलीकर यांनी घेतली उपोषणकर्त्यांची भेट




**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०३, किनवट (नांदेड) :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे लोकनेते आ.प्रतापराव पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पा.रावणगावकर तसेच किनवट - माहूर विधानसभा मतदारसंघाचे नेते मा. सचिन भाऊ नाईक यांच्या उपस्थितीत आज किनवट - माहूर दौरा पार पडला. दौर्या दरम्यान किनवटवरून माहूरकडे जात असताना सारखानी येथे बंजारा समाजाच्या हक्कांसाठी ॲड.प्रदीप भाऊ राठोड आणि राहुल भाऊ चव्हाण हे मागील सहा दिवसांपासून अमर उपोषण करत असल्याचे समजताच, सचिन भाऊ नाईक यांनी आमदार प्रतापराव चिखलीकर साहेबांना थेट उपोषण स्थळी भेट देण्याची विनंती केली. त्यावर आमदार चिखलीकर यांनी तत्काळ उपोषण स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांची विचारपूस केली व त्यांचे निवेदन स्वहस्ते स्वीकारले. त्यांनी शासनाने तातडीने या विषयाची दखल घेऊन बंजारा समाजाच्या मागण्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी केली. या प्रसंगी समाजातील नागरिकांनी आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी आमदारांच्या उपस्थितीबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी शासनाने लवकरच उपोषणकर्त्यांच्या मागण्यांची पूर्तता करून समाजाला न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश संघटन सचिव डॉ.उत्तमराव सोनकांबळे, युवक जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे पाटील, जिल्हा सचिव प्रवीण घुले, चेतन मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## नवी मुंबईत बालनाट्य शिबिराचा समारोप संपन्न

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०३, नवी मुंबई :** दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी मुंबई बालरंगभूमी आणि संत शिरोमणी कला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने नाटककार श्रीहरी पवळे यांनी मार्गदर्शन केलेल्या बालनाट्य अभिनय कार्यशाळेचा समारोप ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह येथे सकाळी अकरा वाजता संपन्न झाला. गेली २९ वर्षे बालनाट्य कार्यशाळेचा उपक्रम सतत सुरू ठेवणे अनेक संकटांना सामोरे जाऊन उपक्रमाचे अखंड सातत्य ठेवणे नवी मुंबईच्या इतिहास लिहिला जाईल. तेव्हा या उपक्रमाची नोंद घेतली जाईल असे उद्गार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.नंदकिशोर जोशी अध्यक्ष छत्रपती शिक्षण मंडळ अप्पा जोशी प्रतिष्ठान नवी मुंबई यांनी काढले. याप्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी रवींद्र आवटी, अशोक पालवे, प्रा.रवींद्र पाटील शिवतुतरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष, ऐतिहासिक मालिकांमध्ये काम करणारे अभिनेते गणेश वाघमारे उद्योजिका, अर्चना खरात कवयित्री सुचिता खाडे उपस्थित होते. दिवाळी सुट्टीतील या बालनाट्य शिबिरात एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शिबिरातील बालकलाकार कुमारी श्रीमयी लाडके शिबिराविषयी अनुभव कथन करताना विविध पैलूंचा कसा अभ्यास करावा व सराव करावा याचा आम्हाला खूप फायदा होतो. असे नमूद केले त्याचबरोबर पालक ज्योत्स्ना बाणखेले यांनी शिबिरातील आलेले अनुभव सांगताना माझ्या मुलींमध्ये वागण्यात अभ्यासात किती बदल झाला व आत्मविश्वास कसा वाढला असे नमूद केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे हस्ते शिबिरार्थींना प्रमाणपत्र देऊन गौरविले. शिबिरार्थींनी सादर केलेल्या प्रयोगक्षम संदेश देणाऱ्या बालनाटिका यावेळी सादर केल्या. माय मराठी, शूटिंग शूटिंग, आणि सावधान आपल्या मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला त्याचा धागा पकडून अजूनही अतिदुर्गम भागात मराठी भाषा पोहोचविण्यासाठी केलेले सादरीकरण अप्रतिम झाले. तसेच शूटिंग शूटिंग या बालनाट्यातून एखादी कला विकत घेता येत नाही ती उपजत असावी लागते असा आशय असणारी बालनाटिका सादर झाली. त्यानंतर सावधान या बालनाटिकेतून लहान मुले आणि मोबाईल यावर प्रकाश टाकण्यात आला. लहान मुले मोबाईलच्या किती आहारी गेली त्यातून होणारे आजार दुष्परिणाम यावर भाष्य करणारी आणि संस्कार किती महत्त्वाचे आहे. हे दाखविले उपस्थित सर्व पाहुणे आणि पालकांनी या तीनही संदेश देणाऱ्या बालनाटिकांचे कौतुक केले या शिबिराचे मार्गदर्शक नाटककार श्रीहरी पवळे यांनी संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी विद्यार्थ्यांना देऊन एक आगळावेगळा पायंडा पाडला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. प्रिशा खरात, प्रमाणपत्र वाचन व आभार प्रदर्शन.प्रारंभी पालेकर स्वागतगीत .स्वरा साळवी. नृत्य सादरीकरण युक्ता अहिरे, साक्षी शिंदे, पार्श्व संगीत राहुल मोहन अहिरे, प्रकाश योजना, सौरभ धुमाळ, व्यवस्थापन तन्वी शिंदे, उद्योजिका अर्चना खरात व नवी मुंबई प्रेस क्लब सहकार्य लाभले. अतिशय आनंदी वातावरणात शिबिर संपन्न झाल्याबद्दल शिबीरार्थींच्या पालकांनी श्रीहरी पवळे यांचे शिबिर यशस्वी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## किल्ले प्रतापगडच्या सुविधांसाठी आवश्यकतेनुसार देवस्थानची जमीन देवू - खा.उदयनराजे भोसले



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०३, सातारा :** पर्यटनाच्या दृष्टीने महाबळेश्वर हे देशातील महत्वपूर्ण पर्यटन स्थळ असून या पर्यटनस्थळाला दरवर्षी १८ ते २० लाख लोक भेट देतात. प्रतापगड हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे गौरवशाली प्रतिक आहे. या ठिकाणी सर्व वयोगटातील लोक मोठ्या संख्येने येत असतात. अनेकदा इच्छा असूनही लहान मुले, वयस्कर नागरिक यांना गडावर चढता येत नाही. त्यांच्यासाठी रोपवे, फर्निक्युलर यंत्रणा यांची सुविधा असणे आवश्यक आहे. तसेच सुसज्ज वाहन तळही आवश्यक आहे. प्रतापगडाच्या पायथ्याला वन विभागाच्या खालोखाल प्रतापगड देवस्थानची जमीन आहे. या सुविधांसाठी आवश्यकता भासल्यास देवस्थानची जमीन उपलब्ध करुन दिली जाईल, अशी ग्वाही खासदार तथा प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी दिली.

प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणाची बैठक खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला प्रतापगड किल्ला विकास प्राधिकरणाचे सह अध्यक्ष शंभूराज देसाई (दृरदृश्यप्रणालीद्वारे), जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, पुरातत्व विभागाचे सहसंचालक डॉ.विलास वाहने, प्रांताधिकारी डॉ.योगेश खरमटे, तहसीलदार सचिन मस्के, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत थोरात, प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य मिलिंद एकबोटे, नितीन शिंदे, शरद पोंक्षे, सदाशिव टेंटविलकर, सोमनाथ धुमाळ, चंद्रकात पाटील, विजय नायडू, अमोल जाधव, पंकज चव्हाण आदी उपस्थित होते.

प्रतापगड हे जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित झाले आहे. प्रतापगड किल्ल्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतापगड किल्ला प्राधिकरण स्थापन करण्यात आले असून या प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले तर सह अध्यक्ष पालकमंत्री शंभूराज देसाई हे आहेत. या प्राधिकरणाची आज पहिली बैठक संपन्न झाली. प्रतापगड किल्ला जनत व संवर्धनासाठी १२७ कोटी निधी मंजूर केला असून यामधून संवर्धनाची विविध कामे करण्यात येणार आहेत.

प्रतापगड प्राधिकरणाचे बँक खाते उघडणे, निधी मागणी करणे, प्राधिकरणाकरिता कक्ष स्थापन करणे

प्रतापगड किल्ला (भाग-५) जतन, संवर्धन कामाच्या निविदेस मान्यता देणे, प्रतापगड किल्ला (भाग-६) जतन, संवर्धन कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेणे, सदरील प्रकल्प सल्लागार नियुक्तीस व मानधन शुल्कास मान्यता देणे, लाईट अँड साऊंड शो स्क्रिप्टला मान्यता देणे, आकस्मित खर्च मान्यतेसाठी सुधारीत शासन निर्णय काढणे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भित्तीचित्रास मान्यता देणे, आराखड्यातील उर्वरित कामाचे नियोजन केलेले नकाशे व आराखडे तपासून मान्यता देणे, प्रतापगड किल्ल्यावरील सार्वजनिक बांधकाम विभागाकडील विश्रामगृह (खोली) या विभागाकडे वर्ग करण्यास आदेशित करणे, प्रतापगडाच्या पायथ्यालगत कमानीजवळील वाहनांसाठी जागा निश्चित करणे व विद्युत बस/ई-बस सुविधा कार्यान्वित करणे, प्रतापगड किल्ला भाग ४ च्या प्रथम व द्वितीय देयकास निधी प्राप्त होणेबाबत या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

अनेक देशांची अर्थव्यवस्था ही पर्यटनावर अवलंबून आहे. पर्यटनाला खूप महत्व आहे. सातारा जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत वैविध्यपूर्ण असून या ठिकाणी असणाऱ्या महत्वाच्या पर्यटन स्थळांना लाखो लोक भेटी देतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादी नोंद करण्यात आली आहे. त्यात प्रतापगड किल्ला अत्यंत ऐतिहासिक प्रतापगड किल्ला अत्यंत महत्वपूर्ण आहे.

या किल्ल्याच्या विकासासाठी व पर्यटकांना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरण कटीबद्ध असल्याचे सांगून खासदार श्री.भोसले म्हणाले, प्रतापगडाच्या संवर्धन, जनत व विकासासाठी आवश्यक प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असणारी जागा आवश्यकता भासल्यास प्रतापगड देवस्थानची जागा देण्यात येईल. यावेळी त्यांनी देवस्थानच्या मालकीचे मोठ्या प्रमाणावर क्षेत्र असून येथे असणारी जुने, मोठे वृक्षांची तोड झाली आहे. वन विभागामार्फत तेथील वनराई, वृक्षराजी पुन्हा संवर्धीत करण्यात यावी, असेही त्यांनी बैठकीत सांगितले.

एकात्मिक पर्यटन आराखडा जिल्ह्यासाठी ३८१ कोटी ५६ लाखाचा मंजूर करण्यात आला असून प्रतापगड जतन व संवर्धनासाठी १२७ कोटींचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, किल्ले प्रतापगडच्या आजूबाजुला जवळपास चौदा किल्ले आहेत. या चौदा किल्ल्यांना पार करुन प्रतापगडावर येणे हे शत्रु सैन्यासाठी दुरापास्त बाब होती.

किल्ले प्रतापगडचे भौगोलिक स्थान पाहिले असता छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी व युद्धनीती यातून अधोरीत होते. याची माहिती पुढील पिढीला होणे आवश्यक आहे. यासाठी प्रतापगड जनता व संवर्धन विकास आराखडा राबविण्यात येत आहे. या अंतर्गत विविध कामे होत असतांना किल्ल्याच्या मुळ ढाच्याला कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही याची दक्षता घेऊनच किल्ल्याचे संवर्ध करण्यात येईल. यावेळी अशासकीय सदस्यांनी मांडलेल्या सूचनांबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय मानांकन प्राप्त दुर्गापूर प्रा.आ.आरोग्य केंद्राला आ.मुनगंटीवारांची भेट




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** भरघोस गुणांसह राष्ट्रीय मानांकन प्राप्त करणाऱ्या दुर्गापूर प्राथमिक आरोग्य केंद्राला बल्लारपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी भेट देऊन पाहणी केली. संस्थेचा नावलौकिक राष्ट्रीय स्तरावर वाढविल्याबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांनी कौतुक केले. तसेच जिल्यातील इतर आरोग्य संस्थांनी सुद्धा राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन समितीचे (एन.क्यू.ए.एस.) मानांकन पात्र होण्यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कोमल मुनेश्वर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित जैस्वाल यांच्यासह केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य क्षेत्रात गुणवत्तेचे अनन्यसाधारण महत्व असते. या गुणवत्तेचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ पद्धतीने करण्याकरिता अनेक पद्धती आहेत. त्यापैकी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन समितीचे (एन.क्यू.ए.एस.) मानांकन हे सर्वोत्कृष्ठ मानले जाते. या मानांकन प्राप्त आरोग्यसंस्थेद्वारे रुग्णांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यात येतात. आयुष्मान आरोग्य मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र दुर्गापूरला (एन.क्यु.ए.एस.) मार्फत केल्या गेलेल्या मुल्यांकनामध्ये मानांकन प्राप्त झालेलं आहे.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक मध्ये आरोग्य संस्थेत एकूण ६ विभाग असतात. यात बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, प्रसूती विभाग, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, प्रयोगशाळा विभाग, सामान्य प्रशासन विभाग याचा समावेश आहे. या प्रत्येक विभागामध्ये किमान ७० टक्के गुणांकन प्राप्त करणे अत्यावश्यक असते.

यामध्ये आधी राज्य पातळीवर यशस्वी झाल्यानंतरराष्ट्रीय पातळीवर मुल्यांकन करण्यात येते. मूल्यांकनामध्ये प्रा. आ. केंद्र, दुर्गापूर ला ९४.६४ टक्के गुणांकन मिळून जिल्ह्यामध्ये एन.क्यु.ए.एस. पात्र संस्थेचा प्रथम मान मिळाला. सध्यस्थितीत चंद्रपूर जिल्यातील ११ आरोग्य संस्था राज्य पातळीवर एन.क्यू.ए.एस. साठी पात्र झाल्या असून त्यापैकी ३ संस्थांचे राष्ट्रीय पातळीवर मुल्यांकन पूर्ण झाले आहे. प्रा. आ. केंद्र, गंगालवाडी आरोग्य संस्था अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्र ठरलेली आहे. तसेच प्रा. आ. केंद्र, नांदा फाटा या संस्थेचे राष्ट्रीय पातळीवर मुल्यांकन पूर्ण झाले असून निकाल लागायचा आहे.

उर्वरित ८ आरोग्य संस्था - प्रा. आ. केंद्र राजोली (मुल), कळमना (बल्लारपूर), नेरी (चिमूर), वाढोणा (नागभीड), नवेगाव पांडव (नागभीड), बाळापुर (नागभीड), मोहाडी नलेश्वर (सिंदेवाही), माढेळी (वरोरा) यांचे एन. क्यु. ए. एस. मूल्यमापन माहे नोव्हेंबर मध्ये होण्याचे नियोजित आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी कळविले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या प्रसूती विभागात खाटा वाढवल्या




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या प्रसूती विभागात प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांची संख्या लक्षात घेऊन तेथील खाटांची संख्या वाढवून ९० करण्यात आली आहे. त्याशिवाय, मुंब्रा येथील प्रसूतिगृहाकडून येणाऱ्या रुग्णांचा ओघ लक्षात घेऊन स्वातंत्र्यसैनिक हकीम अजमल खान रुग्णालयातील एम.एम.व्हॅली प्रसूतिगृहास छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या विस्तारीत केंद्राचा दर्जा देऊन तेथे अद्ययावत प्रसूतीशास्त्र विभाग पूर्ण स्वरूपात लवकरात लवकर सुरू करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील प्रसूती शास्त्र विभागात दररोज सुमारे २०० बाह्य रुग्ण येतात. तसेच, प्रसूती पश्चात कक्षात आता एकूण ७० खाटा उपलब्ध आहेत. उपरोक्त विभागात दररोज सरासरी १८ प्रसुती होतात. ऑक्टोबर २०२५ मध्ये दररोज २२ प्रसूती झाल्या. त्याचबरोबर, बहुतांश वेळा उपरोक्त कक्षात एकूण ९८ महिला दाखल होत्या. रुग्णालयात ठाणे महानगरपालिका क्षेत्र तसेच आजूबाजूच्या क्षेत्रातून तसेच ठाणे ग्रामीण व पालघर ग्रामीण क्षेत्रातून महिला प्रसूतीसाठी येतात. त्यामुळे बहुतांश वेळा खाटा पूर्णपणे भरलेल्या असतात.

या परिस्थितीवर तोडगा काढण्यासंदर्भात, शुक्रवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी,उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद पाटील, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राकेश बारोट आणि रुग्णालय अधिक्षक डॉ. अनिरुद्ध माळगावकर उपस्थित होते. या बैठकीत छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथील प्रसूतीविभागावर येत असलेल्या ताणाची सविस्तर चर्चा झाली. त्याची कारणमिमांसा करताना दरमहा सुमारे १०० प्रसूतीपूर्व महिला या स्वातंत्र्यसैनिक हकीम अजमल खान रुग्णालय येथील प्रसूतीगृहातून पाठवल्या जात असल्याचे निदर्शनास आले. या प्रसुतीगृहात आप्तकालीन सिझेरियन सेक्शन शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून दिल्यास तेथून प्रसूतीसाठी महिलांना छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठवणे कमी होईल, त्यातून प्रसूती विभागावर असलेला ताण कमी होऊन तेथे खाटा उपलब्ध होतील, असे अधिष्ठाता डॉ. बारोट यांनी सांगितले. त्यानुसार, स्वातंत्र्यसैनिक हकीम अजमल खान रुग्णालय येथील प्रसूतीगृहात लवकरात लवकर अद्ययावत प्रसूती सुविधा सुरू करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ नियुक्त करणे, साधनसामुग्री घेणे आदी कामांचा आराखडा सोमवारी सादर करावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. हा प्रसूतीविभाग, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे विस्तारीत केंद्र म्हणून जलद सुरू करण्याचेही स्पष्ट निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत.

# ३६व्या किशोर /किशोरी गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०३, मुंबई :** परभणी विरुद्ध बीड, पिंपरी-चिंचवड विरुद्ध रायगड, रत्नागिरी विरुद्ध मुंबई उपनगर पूर्व या किशोर गटाच्या, तर नाशिक शहर विरुद्ध ठाणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड विरुद्ध नांदेड, परभणी विरुद्ध जळगांव या किशोरी गटाच्या सामन्यानी ३६व्या किशोर व किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला दि. ०५ नोव्हे.पासून प्रारंभ होईल.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असो.च्या यजमान पदाखाली राकेशभाऊ घुले कबड्डी संघ यांच्या विद्यमाने पाच दिवस चालणाऱ्या या स्पर्धेची गटवारी राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांनी सर्व प्रसार माध्यम ाकरिता जाहीर केली.

गतवर्षी मनमाड-नाशिक येथे झालेल्या या स्पर्धेत परभणीने किशोर सहज, तर यजमान नाशिक शहरने किशोरी गटात चूरशीची लढत देत विजेतेपद पटकाविले होते. पिंपरी-चिंचवड संघाला मात्र दोन्ही गटात उपविजेत्यापदावर समाधान मानावे लागले होते.

**किशोर गट विभागणी :-**

१) अ गट : १) परभणी, २) जळगांव, ३) बीड.

२) ब गट : १) पिंपरी-चिंचवड, २) पुणेशहर, ३) रायगड, ४) सोलापूर.

३) क गट : १) रत्नागिरी, २) नांदेड, ३) मुंबई उपनगर पूर्व, ४) सिंधुदुर्ग.

४) ड गट : १) जालना, २) पालघर, ३) नाशिक शहर, ४) हिंगोली.

५) इ गट : १) ठाणे ग्रामीण, २) उस्मानाबाद, ३) नाशिक ग्रामीण, ४) सातारा.

६) फ गट : १) कोल्हापूर, २) औरंगाबाद, ३) धुळे, ४) मुंबई शहर पूर्व.

७) ग गट : १) मुंबई उपनगर पश्चिम, २) अहम दनगर, ३) लातूर, ४) ठाणे शहर.

८) ह गट :- १) नंदुरबार, २) सांगली, ३) मुंबई शहरपश्चिम, ४) पुणे ग्रामीण.

**किशोरी गट विभागणी :-**

१) अ गट : १) नाशिक शहर, २)मुंबई उपनगर पश्चिम, ३) ठाणे ग्रामीण.

२) ब गट : १) पिंपरी-चिंचवड, २) नंदुरबार, ३) नांदेड,४) बीड.

३) क गट : १) परभणी, २) रत्नागिरी, ३) जळगांव, ४) सोलापूर.

४) ड गट : १) सांगली, २) ठाणे शहर, ३) सातारा, ४) औरंगाबाद.

५) इ गट : १) पुणे ग्रामीण, २) अहमदनगर, ३) पालघर, ४) धुळे.

६) फ गट : १) नाशिक ग्रामीण, २) कोल्हापूर, ३) लातूर, ४) हिंगोली.

७) ग गट : १) जालना, २) पुणे शहर, ३) उस्मानाबाद, ४) सिंधुदुर्ग.

८) ह गट : १)मुंबई उपनगर पूर्व, २) रायगड, ३) मुंबई शहर पश्चिम, ४) मुंबई शहर पूर्व.

# थोडक्यात

## बल्लारपूर शहर, ग्रामीण भागातील भजन मंडळांना भजन साहित्य वाटपाचा उपक्रम




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** भजनातून सम ाजात श्रद्धा, संस्कार आणि एकतेचा प्रकाश जागविण्याच्या उद्देशाने राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर शहर आणि ग्रामीण भागात भजनसाहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. तुकाराम सभागृह येथे झालेल्या या कार्यक्रमात भजन ही मनाची साधना असून त्यातून चित्तशांती आणि समाधान लाभते, असा भाव त्यांनी व्यक्त केला. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करताना १८० भजन मंडळांना साहित्य वितरणाचा तिसरा टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाल्याचा आनंद होत असल्याचेही आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले. बल्लारपूर येथील तुकाराम सभागृह येथे बल्लारपूर शहर व ग्रामीण भागातील भजन मंडळांना भजन साहित्य वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी आ. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी वनविकास मंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, शहर अध्यक्ष रणंजय सिंग, रामपाल सिंग, पिंटू देऊळकर, निलेश खरबडे, किशोर पंदिलवार, श्रीनिवास जंगमवार, द्विवेदी, रेणुका दुधे, वैशाली जोशी, विद्या देवाळकर, समीर केने, काशी सिंग, मनीष पांडे, वैशाली बुद्धलवार आदींची उपस्थिती होती.

आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, सर्वांच्या आशीर्वादाने व सहकार्याने मतदार संघात कार्य करण्याची संधी मिळाली. निवडणूक काळात दिलेला शब्द पूर्ण करत १८० भजन मंडळांना साहित्य वाटपाचा तिसरा टप्पा यशस्वीरीत्या आज पार पडला. याचे मला कम ालीचे आत्मिक समाधान आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दाखविलेला जीवनमार्ग सदैव प्रेरणादायी आहे. नागपूर विद्यापीठाला त्यांचे नाव देण्याचे सौभाग्य आणि मोझरी येथील त्यांच्या ट्रस्टचा उपाध्यक्ष म्हणून कार्य करण्याची संधी लाभली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले. भौतिक सुविधा शरीराची साधना घडवतात, पण मन आणि चित्ताचा खरा आनंद भजनातूनच प्राप्त होतो. भजन साहित्य ही मनाच्या समाधानाची एक समृद्ध बँक आहे. भजनाची राजधानी म्हणून मोझरी ओळखली जावी अशी इच्छा राष्ट्रसंतांच्या चरणी नतमस्तक होऊन व्यक्त केली. मनाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी भजन अत्यंत महत्त्वाचे आहे. भजनाच्या माध्यमातून चित्ताला समाधान मिळते आणि चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलते. भजन साहित्य हे त्याचे सर्वांत मोठे माध्यम आहे, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

# नगरपालिका निवडणुकीत भाजपचा 'एकला चलोचा' नारा, युतीत बिघाडी !

## लोणार नगरपालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा भाजपचा निश्चय

**अक्षराज : उद्धव आटोळे**

**दि.०२, लोणार (बुलडाणा) :** भारतीय जनता पार्टी पक्षाची आगामी लोणार नगरपरिषद निवडणूक २०२५ संदर्भात निवडणूक पूर्व तयारी बैठक दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी लोणार शहरातील दि ग्रँड विश्वनाथ मंगल कार्यालय येथे भारतीय जनता पार्टीचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष विजयराजजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात संपन्न झाली. निवडणूक पूर्वतयारी बैठकीत मंचावर जिल्हाध्यक्ष माजी आम दार विजयराज शिंदे,निवडणूक प्रमुख म ोहन शर्मा, जिल्हा महामंत्री दत्ता पाटील, जिल्हा महामंत्री प्रकाशजी गवई, जिल्हा उपाध्यक्ष विजय मापारी, जिल्हा सचिव शिवाजी सानप, तालुकाध्यक्ष गजानन मापारी, माजी तालुकाध्यक्ष भगवानराव सानप, शहराध्यक्ष शुभम बनमेरू उपस्थित होते.

विधानसभा लोकसभेला बड्या बड्या नेत्यांच्या सतरंज्या उचलून थकलेले कार्यकर्ते आता काहीही ऐकण्याच्या म नस्थितीत नाहीत पक्षाच्या कार्यकर्त्यांना संधी देणार कधी? प्रत्येकाला निवडणूक लढविण्याची आणि स्वतःची ताकद आजमाविण्याची इच्छा असते. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हाच एकमेव पर्याय असतो. त्यामुळे बूथ कमिट्या, कार्यकर्ते यांची बांधणी होते. संघटनेच्या आरोग्यासाठी ते चांगले असते. कार्यकर्त्यांची ताकद नेत्यांना कळते. ही बाब भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांनी लक्षात घेऊन झालेल्या बैठकीत लोणार शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना नगर पालिका निवडणुकीत 'एकला चलो रे' हा संदेश देत नगरपरिषद निवडणूक लोणार शहरात भाजप स्वबळावर लढणार असल्याची घोषणा करताच जोरदार टाळ्याचा कडकडाट तसेच लोणार शहरातील व तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आनंद दिसून आला आहे. युती किंवा आघाडीमुळे लोणार शहरात भाजपने अनेक वर्षापासून नगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवली नाही. मात्र २०२५ या निवडणुकीत कार्यकर्त्यांना आता स्वतः ची ताकद दाखविण्याची संधी चालून आली आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी

''मेरा पानी उतरता देख, मेरे किनारे पर घर मत बना लेना, मैं समंदर हूं, लौट कर वापस आउंगा या डायलॉगने भाषणाला सुरुवात केली.लोणार शहरात १९६० पासून भाजपचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मतदार असून आजही ते भाजप पक्षाला महत्त्व देतात. शहरात यापूर्वी नगरसेवक, नगराध्यक्ष भाजपाचे निवडून आलेले आहेत. त्यामुळे आजही लोणार शहरात भाजपा पक्षाला मान, सन्मान असून भाजप पक्षाची लोणार शहरात उत्तम प्रतिष्ठा आहे.



लोणार शहरात भाजप पक्षाचा प्रचंड वारसा आहे. अनेक लोक त्यांच्या पिढ्या जनसंघापासून काम करण्यात गेल्या आहेत असे अनेक सामान्य नगरीक लोणार शहरसह ग्रामीण भागात आजही जिवंत आहे. त्याचप्रमाणे आज रोजी राज्यात महायुतीची सत्ता असून या महायुतीत भाजप पक्ष असून मुख्यमंत्री भाजपाचा आहे तर केंद्रात भाजपची एक हाती सत्ता आहे. यामुळे आज रोजी भाजपा पक्षाचे नावलौकिक आहे. तेव्हा होणाऱ्या लोणार नगर परिषद निवडणुकीत इच्छुक उमेदवारांनी पूर्ण ताकतीने

निवडणूक रिंगणात उतरून निवडून येत लोणार नगर पालिकेवर भाजपा पक्षाचा झेंडा फडकावा अशी घोषणा तसेच शुभेच्छा दिली आहे. झालेल्या बैठकीत इच्छुक नगरसेवक ३८ व नगराध्यक्ष ६ असे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांचे फॉर्म आले असून या उमेदवारांची मुलाखत निवडणूक प्रमुख यांनी घेतली आहे

लवकरच लोणार शहरातील प्रत्येक प्रभागातील उमेदवार तसेच नगराध्यक्ष पदाचा उमेदवार भाजपा घोषित करणार असल्याची माहिती तालुका अध्यक्ष गजानन मापारी यांनी आज रोजी दिली आहे. यापूर्वी विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गट व भाजपा पक्षाची युती असताना आता नगर परिषद लोणार निवडणुकी अनुषंगाने या दोन्ही पक्षात मैत्रीपूर्ण लढत झाली तर दोन्ही पक्षांचं नुकसान होईल आणि विरोधी पक्षांना याचा फायदा होईल. असे राजकीय तज्ञ मत व्यक्त करीत आहे एवढे मात्र खरे.

यावेळी युवा मोर्चा जिल्हा महामंत्री शुभम देसाई, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष देवांग संचेती, सुरेश अंभोरे, किसन मोर्चा जिल्हा महामंत्री मारोतराव सुरोशे, गणेश तांगडे, सोशल मीडिया उद्धव आटोळे, नारायण आढाव, सचिन फोलाने, गोविंद जायभाय, विनोद थोरवे, सचिन डाहळके, राजेंद्र डोळे, प्रमोद वराडे, शिवप्रसाद जाधव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरुकृपा योगा अकॅडमीकडून मोफत योगा क्लासेसचे आयोजन

### केज शहरातील महिलांनी लाभ घेण्याचे सुवर्णा शेटे यांचे आवाहन




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०३, केज (बीड) :** केज शहरामध्ये मागील काही महिन्यांपासून कार्यरत असलेल्या गुरुकृपा योगा अकॅडमीकडून महिला, पुरुष व लहान मुलांसाठी एक महिन्याचे मोफत योगा डेमो क्लासेसचे आयोजन करण्यात आले आहे. दि.०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान या क्लासचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे सकाळी ५.१५ ते ६.३० यावेळेत भवानी मंदिर, धारुर रोड, केज येथे व सकाळी ११ ते १२ यावेळेत आवाड एज्युकेशनल अकॅडमी, कानडी रोड केज येथे या क्लासचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महिला - पुरुषांचे विविध शारीरिक समस्या, लहान मुलांमधील स्थूलता याविषयी माहिती देवून योगासने करून घेतली जाणार आहेत. तरी जास्तीत जास्त महिला पुरुषांनी व लहान वयोगटातील मुलांनी या एक महिन्याच्या मोफत क्लासचा लाभ दोन्ही वेळेपैकी आपल्या सोयीच्या वेळेनुसार घ्यावा असे आवाहन संचालिका योगशिक्षिका सुवर्णा शेटे यांनी केले आहे.

# नमन लोककलेची विटंबना खपवून घेणार नाही - चंद्रकांत धोपट

## नमन लोककला संस्था मुंबई शाखेची नूतन कार्यकारणी जाहीर अध्यक्षपदी चंद्रकांत धोपट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुंबई :** कोकणातील नमन लोककलेच्या राजमान्यता सह लोककलावंतांच्या न्याय हक्कासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत असलेली नमन लोककला संस्थेच्या वतीने मुंबईतील नमन कलामंच निर्माते, लोककलावंत यांना मुंबईत भेडसावणाऱ्या अडचणी/समस्या जाणून घेण्यासाठी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष रवींद्र मटकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेला मुंबईतील नमन कलामंच, निर्माते, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर सभेत नमन लोककलेत चुकीचे सादरीकरण करून नमन लोककलेची विटंबना होत असल्याचे भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत. मुंबईतील नाट्यगृहांच्या व्यवस्थापनाकडून नमन निर्माते, आयोजक, कलाकार यांच्या प्रति विविध कारणे होत असलेला दुजाभाव त्यात मुख्यत्वे हॉल भाडे, हॉल वेळेत न देणे, शनिवार, रविवार तसेच सुट्टीचे वार उपलब्ध होत नसल्याचे अनेक सम स्या उपस्थितांतून समोर आल्या आहेत. सदर सभेत अशा विविध समस्येवर चर्चा होऊन मुंबई स्तरावर नमन लोककला



संवर्धनकर्ते, निर्माते, कलाकार यांच्या समस्या जलदगतीने मार्गस्थ होण्यासाठी नमन लोककला संस्थेची मुंबई शाखेची नूतन कार्यकारणी निवड करण्यात आली असून अध्यक्ष पदी चंद्रकांत धोपट, उपाध्यक्ष नितीन मोरे, सरचिटणीस दीपक कारकर, सह सचिव सागर डावल, खजिनदार पदी रुपेश साटले, सदस्य मि लिंद ठीक, विनय बने, अभिषेक खापरे, शैलेश घाणेकर यांची निवड करण्यात आली. मुंबई शाखेचे नवनिर्वाचित अध्यक्ष चंद्रकांत धोपट यांनी पदभार स्वीकारल्यानंतर मनोगतातून व्यक्त होत मुंबईतील नमन निर्माते, कलाकार यांना भेडसावत असणाऱ्या समस्या दूर होण्या कामी तसेच संघटन वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे सांगत, नमन लोककला संवर्धन होत असताना नमन लोककलेचा मूळ बाज,पारंपरिककता अबाधित ठेवत नमन निर्माते, कलामंच प्रमुख, कलाकार यांनी नमन लोककला सादर करावी असे आवाहन केले आहे.

भविष्यात नमन लोककलेत कोणत्याही प्रकारे विटंबना खपवली जाणार नाही तसे आढळल्यास मुंबई शाखेच्या वतीने सदर निर्माता, कलामंच प्रमुख यांच्या बाबत कठोर पावले उचलली जातील असे स्पष्ट संकेत दिले आहेत.

सदर सभेला न.लो.संस्थेचे मध्यवर्ती सचिव सुधाकर मास्कर, उपाध्यक्ष रम ाकांत जावळे, खजिनदार सतीश जोशी, सदस्य संदिप कानसे, उदय दणदणे, गुहागर शाखा सदस्य दीपक वेलुंडे, संजय कळबाटे आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# उज्वल गौरक्षण संस्थेचे सामाजिक सेवा, धर्मप्रसार आणि संस्कार निर्मितीचे कार्य प्रेरणादायी - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** उज्वल गौरक्षण संस्थेने अन्नकूट महाप्रसादाचे आयोजन करत श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर मिलाफ घडवून आणला आहे. अन्नकूट महाप्रसादाचा हा सोहळा म्हणजे केवळ धार्मिक परंपरा नाही, तर ती आपल्या संस्कृतीचा, करुणेचा आणि सेवाभावाचा सजीव उत्सव आहे. या संस्थेने केवळ गौरक्षा केली नाही, तर सामाजिक सेवा, धर्मप्रसार आणि संस्कारनिर्मितीचे कार्य देखील आत्मभावाने केले आहे. हे कार्य प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले. दिनांक ०२, नोव्हेंबर २०२५ रोजी उज्वल गौरक्षण संस्था, चंद्रपूर यांच्या वतीने लोहारा येथे श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक भावनेने अन्नकूट महाप्रसाद कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले. दिव्य वातावरणात सतत चालणाऱ्या हरिनाम कीर्तनाने आणि भक्तीमय गजरांनी परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला.

समाजातील विविध स्तरांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला. या कार्यक्रम ात आ. किशोर जोरगेवार बोलत होते.



यावेळी भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री मनोज पाल, उज्वल गौरक्षण संस्थेचे जुगलकिशोर सोमानी, दीपक पारख, हेमंत शाहा, देशपांडे, दिनेश बजाज, हेमंत बुट्टन, मेहुल सजदे, गौरीशंकर मंत्री, सुधीर बजाज, कैलास सोमानी, राजेश डागा आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, गौमाता ही भारतीय संस्कृतीत मातृ स्वरूप मानले जाते. तिच्या संरक्षणातूनच पर्यावरण, शेती आणि समाज यांचे संतुलन टिकते. आज येथे उपस्थित सर्व भाविकांनी ज्या भक्तिभावाने सहभाग घेतला आहे, तो आपल्यातील सामाजिक एकात्मतेचा उत्तम नमुना आहे.

सततचा हरिनाम कीर्तनाचा ध्यास आणि दिव्य वातावरण हे केवळ अध्यात्म नव्हे, तर जीवनशुद्धीचा मार्ग आहे. अशा संस्था समाजाला दिशा देतात आणि सेवा, सद्भाव व संस्कार यांची मूल्ये दृढ करतात. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन समाजासाठी काहीतरी देण्याचा संकल्प करावा, असे यावेळी आ.किशोर जोरगेवार म्हणाले. गौरक्षण हे केवळ धार्मिक कर्तव्य नाही, तर ते आपल्या संस्कृतीचे, संवेदनेचे आणि पर्यावरणाच्या संरक्षणाचे प्रतीक आहे. अशा उपक्रमांम ुळे समाजात सद्भाव, संस्कार आणि सेवा यांची भावना अधिक दृढ होते. आजच्या अन्नकूट कार्यक्रमात जी एकात्मता आणि श्रद्धा दिसली, ती समाजातील ऐक्याचे जिवंत उदाहरण असल्याचे ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.